# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक :- १३/०७/२०१८

## औरंगाबाद शहरातुन चोरी केलेली ट्रॅव्हल्स बस मालेगाव येथे जप्त

## मोटर वाहने चोरणारा गुन्हेगार स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात

---

नाशिक ग्रामीण जिल्हयातील गुन्हेगारी व अवैध व्यवसायांचा फास आवळण्यासाठी **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो** यांनी जिल्हयाचे सिमावर्ती भागात चेकपोस्ट उभारून सशस्त्र नाकाबंदीची योजना तयार केली आहे. जिल्हयात घडणारे गंभीर गुन्हयांचा अभ्यास केल्यानंतर प्रामुख्याने दरोडा, जबरी चोरी, अवैध दारू वाहतुक, जनावरांची वाहतुक करणारे गुन्हेगार हे सिमावर्ती जिल्हयातुन नाशिक जिल्हयात येत असल्याचे समोर आले आहे. यासाठी जिल्हयातील गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी सशस्त्र नाकाबंदी, गुप्त पॉईंट, चेकपोस्ट तसेच दरोडागस्त स्किम तयार करण्यात आली असुन याव्दारे सिमावर्ती राज्य व जिल्हयातुन येणारे गुन्हेगारांना आळा बसणार आहे. त्याप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांना महामार्गावरील गुन्हयांमधील आरोपीतांचा शोध घेणेसाठी सतर्क गस्त घालणेबाबत सुचना दिल्या होत्या.

दिनांक १२ जुलै २०१८ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथकातील अधिकारी व कर्मचारी नाशिक ते धुळे महामार्गावर गस्त घालत होते, दरम्यान पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे यांना मिळालेल्या गुप्त बातमीचे आधारे औरंगाबाद शहरातील सिडको परिसरातुन चोरी केलेली ट्रॅव्हल्स बस काही इसम नांदगाव ते मालेगाव रोडने धुळे बाजुकडे येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली, त्याप्रमाणे स्थागुशाचे पथकाने महामार्ग पोलीसांचे मदतीने मुंबई आग्रा महामार्गावर चाळीसगाव चौफुली परिसरात सापळा रचला. दरम्यान मध्यरात्रीचे सुमारास एक सफेद रंगाची ट्रॅव्हल्स बस धुळे बाजुकडे येतांना दिसली, सदर बसवरील चालकास बस थांबविण्याचा इशारा केला असता, त्याने बस भरधाव वेगाने चालवुन धुळे बाजूकडे पळुन गेला, स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी पाठलाग करून सदर बस चिखल ओहोळ शिवारात अडविली. बसवरील चालक **नामे शेख अनिस शेख युसूफ, वय २५, रा. कवडगाव, ता.पैठण,जि.औरंगाबाद** यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने सदर बस हि औरंगाबाद-सिडको परिसरातील एम.जी.एम. हॉस्पिटल भागातुन चोरी केली असल्याची कबुली दिली आहे. सदर बाबत **औरंगाबाद शहर सिडको पोलीस ठाणेस** दाखल असलेला **। गुन्हा रजि.नं. २३१/२०१८ भादवि कलम ३७९** हा गुन्हा उघडकीस आलेला असुन ताब्यात घेतलेला आरोपी व चोरीस गेलेली **टाटा कंपनीची ट्रॅव्हल्स बस एम.एच.०५-८५७३** गुन्हयाचे पुढील तपासकामी औरंगाबाद शहर सिडको पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक श्री. **हर्ष पोद्दार सो.** यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** सपोनि श्री. संदिप दुनगहू, सपोउनि सुनिल आहिरे, पोहवा वसंत महाले, राजु मोरे, सुहास छत्रे, पोना राकेश उबाळे, पोकॉ फिरोज पठाण, रतिलाल वाघ तसेच महामार्ग सुरक्षा पथक मालेगाव येथील कर्मचारी यांनी सदर आरोपीस ताब्यात घेवुन कामगिरी केली आहे.